क्र. महसुल कक्ष १/ टे-९/एनएपी/एसआर- १०३/२००९
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे.
दिनांक - 8 SEP 2009

वाचले :-

१. मे. डी.डी.पी.एल ग्लोबल इंफ्रास्ट्रकचर प्रा.लि.चे संचालक श्री. हेमंत अनंत पाटील व श्री. अमोल शंकरराव बोरकर, श्री. वत्सलाबाई बाबुराव भोईर व इतर, श्री. ॲन्थोनी जॉण परेरा, श्रीम. नर्मदा चांगो कचरे व इतर, श्री. भालचंद्र काळ्या भोईर, श्री. वासुदेव कृष्णा भोईर, श्री. रमेश नारायण शिंपी, श्री. नरोत्तम कृष्णा पाटील व इतर ह्यांच्या तर्फे कुळमुखत्यारी स्वत: श्री. हेमंत अनंत पाटील, रा. ए/४ सदिच्छा कॉ. सो. लि. रोकडीया लेन एस.वी.पी रोड. बोरीवली (प) मुंबई ह्यांचा अर्ज दिनांक २२/१२/२००८, ९/०६/२००९ व पुनश्च केलेला अर्ज दिनांक २५/०८/२००९

२. असो. प्लॅनर, सिडको वसई यांचा बिनशेतीसाठी ना हरकत दाखला क्र सिडको/ व्हीव्हीएसआर/एनएएनोसी- २५१/ई/३९१९, दिनांक १९/०५/२००९

३. ग्रुप ग्रामपंचायत राजावली ह्यांच्या कडील बांधकाम परवानगी बाबत पत्र क्र. ७५२/ २००८/ २००९ दि. ११/०२/२००९

४. ग्रुप ग्रामपंचायत राजावली ह्यांच्या कडील पाणी पुरवठा दाखला पत्र क्र. ७५२/२००८/ २००९ दिनांक ११/०२/२००९

५. ग्रुप ग्रामपंचायत राजावली ह्यांचेकडील रस्त्याबबाबत ना हरकत दाखल्याबाबतचे पत्र क्र. ७५२/२००८/ २००९ दि. ११/०२/२००९

६. अर्जदार ह्यांनी सादर केलेले हमीपत्र दिनांक २०/०८/२००९

७. भूसंपादन शाखेचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक सामान्य/का-४/ टे-३/भूसं/एसआर- दिनांक

८. इकडील कार्यालयाने दिनांक ०३/०१/२००९ रोजीचे मुंबई मित्र या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेला जाहिरनामा.

आदेश :-

ज्या अर्थी मे. डी.डी.पी.एल ग्लोबल इंफ्रास्ट्रकचर प्रा.लि.चे संचालक श्री. हेमंत अनंत पाटील व श्री. अमोल शंकरराव बोरकर, श्री. वत्सलाबाई बाबुराव भोईर व इतर, श्री. ॲन्थोनी जॉण परेरा, श्रीम. नर्मदा चांगो कचरे व इतर, श्री. भालचंद्र काळ्या भोईर, श्री. वासुदेव कृष्णा भोईर, श्री. रमेश नारायण शिंपी, श्री. नरोत्तम कृष्णा पाटील व इतर ह्यांच्या तर्फे कुळमुखत्यारी स्वत: श्री. हेमंत अनंत पाटील रा. ए/४ सदिच्छा कॉ. सो. लि. रोकडीया लेन एस.वी.पी रोड. बोरीवली (प) मंबई ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यातील मौजे टिवरी येथील परिशिष्ट अ,ब,क मध्ये दर्शविलेले क्षेत्र १,५०,६३०-०० चौ.मी. जागेचा रहिवास या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्या बाबत अर्ज केलेला आहे.

आणि ज्या अर्थी, प्रस्तावित जमिनीस बिनशेती परवानगी देण्याच्या संदर्भात दिनांक ०३/०१/२००९ रोजीचे दैनिक मुंबई मित्र या वृत्तपत्रात जाहिरनामा प्रसिध्द करणेत आला होता. सदर जाहिरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे मुदतीत एकही तक्रार/हरकत या कार्यालयास प्राप्त झाली नाही.

त्या अर्थी आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये त्यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी याद्वारे, १) श्री. अमोल शंकरराव बोरकर २) श्रीमती वत्सलाबाई बाबुराव भोईर ३) श्री. चंद्रकांत बाबुराव भोईर ४) श्रीमती हेमलता अनंत वाजेकर ५) श्रीमती दमयंती जयवंत भोईर ६) श्री. गणपत कान्हा भोईर ७) श्रीमती यमुना कृष्णा भोईर, ८) श्री. सुभाष कृष्णा भोईर, ९) श्री. देवानंद कृष्णा भोईर, १०) श्रीमती पुष्पा राजन म्हात्रे, ११) श्रीमती शांती सुरेश किणी, १२) श्रीमती प्रेमा तुळशीदास गावड,

१३) श्रीमती ललिता सिताराम राऊत, १४) श्रीमती रेखा अनिल भोईर, १५)श्रीमती लक्ष्मी जयवंत पाटील, १६) श्री. जयवंत मोरेश्वर भोईर, १७) प्रभाकर मोरेश्वर भोईर १८) श्रीमती मालती लक्ष्मण किणी, १९) श्रीमती वत्सला आत्माराम पाटील २०) श्रीमती मंजुळा रमेश भोईर २१) श्रीमती भारती अशोक पाटील २२) श्री. अंथोनी जॉन परेरा २३) श्रीमती नर्मदा चांगो कचरे २४) श्रीमती कुसुम केदारनाथ भोईर २५) श्रीमती ताराबाई परशुराम किणी, २६) श्री. जयप्रकाश परशुराम किणी २७) श्रीमती चंद्रभागा संदीप पाटील, २८) श्री. हरेश्वर परशुराम किणी २९) श्री. जयवंत धर्मण भोईर ३०) श्री. भालचंद्र काळ्या भोईर ३१) श्री. वासुदेव कृष्णा म्हात्रे ३२) श्री. हरिश्चंद्र कृष्णा भोईर ३३) श्रीमती द्वारकाबाई हुलाजी पाटील ३४) श्रीमती मालती केशव पाटील ३५) मोहना केशव राऊत, ३६) श्री. प्रकाश लक्ष्मण राऊत ३७) श्री. रमेश नारायण शिंपी व इतर ३८) प्रभाकर शामराव वगळ व इतर ३९) मे.डी.डी.पी.एल ग्लोबल इंफ्रास्ट्रकचर प्रा.लि.चे संचालक श्री.हेमंत अनंत पाटील स्वत: व इतर यांचेतर्फे कुळमुखत्यारी रा. ए/४ सदिच्छा कॉ. सो. लि. रोकडीया लेन एस.वी.पी रोड. बोरीवली (प) मुंबई यांनी ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यातील मौजे टिवरी येथील परिशिष्ट अ, ब, क मध्ये दर्शविलेले क्षेत्र १,५०,६३०-०० चौ.मी. जागेचा रहिवास या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापरकरण्याबाबत पुढील शर्तीवर अनुज्ञा (परमिशन) देण्यात येत असुन सिडकोकडील मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम अनुज्ञेय राहील.

त्या शर्ती अशा :-

१ ही परवानगी महाराष्ट्र जमीन अधिनियम १९६६ व त्याखालील केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यात आलेली आहे.

२ अनुज्ञाग्राही व्यक्तीने ( ग्रँटीने ) अशा जमीनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या आणि किंवा अन्य बांधकामाचा उपयोग उक्त जमीनीचा ज्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यांस परवानगी देण्यांत आली असेल त्याच प्रयोजनार्थ केला पाहिजे. आणि त्याने अशी जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा अशी इमारत यांचा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून तशा अर्थाची आगाऊ लेखी परवानगी मिळविल्या शिवाय इतर कोणताही वापर करता कामा नये. इमारतीच्या वापरावरुन जमिनीचा वापर ठरविण्यांत येईल.

३ **संबंधित आराखड्याबाबत मुंबई बडोदरा दृतगती महामार्ग प्राधिकरण, वसई दिवा रेल्वे मार्ग प्राधिकरण, अतिविद्युतदाबासंबंधित प्राधिकारी यांचेकडील परवानगी प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.**

३अ अशी परवानगी देणा-या प्राधिका-याकडून अशा भूखंडाची किंवा त्यांचे जे कोणतेही उपभूखंड करण्या बाबत मंजूरी मिळाली असेल त्या उपभूखंडाची आणखी पोट विभागणी करता कामा नये.

४ अनुज्ञाग्राही व्यक्तीने (अ) जिल्हाधिकारी व संबधित नगरपालिका प्राधिकरण यांचे समाधान होईल अशा रीतीने अशा जमीनीत रस्ते,गटारे वगैरे बांधून आणि (ब) भूमापन विभागा कडून अशा भूखंडाची मोजणी व त्यांचे सीमांकन करुन ती जमीन या आदेशाच्या तारखे पासुन एक वर्षाच्या आंत मंजूर आराखडया प्रमाणेच काटेकोरपणे विकसित केली पाहिजे. आणि अशा रीतीने ती जमीन विकसित केली जाई पर्यंत त्या जमीनीची कोणत्याही रीतीने विल्हेवाट लावता कामा नये.

५ अनुज्ञाग्राही व्यक्तीस असा भूंखंड विकावयचा असेल किंवा त्यांनी इतर प्रकारे विल्हेवाट लावायची असेल तर अशा अनुज्ञाग्राही व्यक्तीने तो भूखंड या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीचे पालन करुनच विकणे किंवा अशा शर्तीनुसारच त्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावणे आणि त्यांचे निष्पादित केलेल्या विलेखात तसा खास उल्लेख करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

६ या सोबत जोडलेल्या सिडकोने मंजूर केलेल्या स्थळ आराखडयात आणि किंवा इमारतीच्या नकाशात निर्दिष्ट केल्या प्रमाणेच जोते क्षेत्रावर बांधकाम करण्या विषयी ही परवानगी देण्यांत आलेली आहे. सदर भूखंडातील नकाशात दर्शविल्या प्रमाणेच उर्वरित क्षेत्र विना बांधकाम मोकळे सोडले पाहिजे.

६अ) प्रस्तावित बांधकाम हे सिडको मंजूर नकाशात दर्शविलेल्या मजल्या पेक्षा जास्त मजल्याचे असू नये.

७ प्रस्तावित इमारत किंवा कोणतेही काम ( असल्यास ) त्यांच्या बांधकामास सुरुवात करण्यापुर्वी अनुज्ञाग्राही व्यक्तीने ( ग्रँटीने ) सिडको यांची असे बांधकाम करण्या विषयाची आवश्यक ती परवानगी मिळविणे हे अशा व्यक्तीवर बंधनकारक असेल.

८ अनुज्ञाग्राही व्यक्तीने सोबत जोडलेल्या सिडको मंजूर नकाशात दर्शविल्या प्रमाणे सीमांतिक मोकळे अंतर ( ओपन मार्जीनल डिस्टेंसेस ) सोडले पाहिजे.

९ या आदेशाच्या दिनांका पासून एक वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमीनीचा बिगर शेती प्रयोजनासाठी वापर करण्यास सुरुवात केली पाहिजे. मात्र वेळोवेळी असा कालावधी वाढविण्यांत आला असेल तर ती गोष्ट अलाहिदा. अनुज्ञाग्राही व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे न केल्यास ही परवानगी आपोआप रद्द झाली असल्याचे समजण्यांत येईल.

१० प्रस्तावित जमिनीपैकी प्रपत्र ब मध्ये दर्शविलेल्या स.नं./हि.नं. ३२/१, २६/२ ब, १२/१०, १२/५, १२/३, १०/४, ५/४, ५/८, २३, १६/४, २६/२ अ, २/३, ४५/४, ५६/२, ६६/६, ३३/२, ३३/४, ३३/७, ५४/६ क्षेत्र ४३,७००-०० चौ.मी. आकार १७-८३ पैसे या जमिनीच्या बाबतीत मुंबई कुळवहीवाट व शेतजमिन नियम १९५६ चे नियम २५(अ) (२) नुसार आकाराच्या चाळीस पट नजराना रक्कम रु. ७१४/- (अक्षरी रक्कम रु. सातशे चौदा मात्र ) चलन क्र. २६४/२००९ (भारतीय स्टेट बँक शाखा ठाणे चलन क्र. ६५७) दिनांक ८/०९/२००९ अन्वये शासन जमा केली आहे.

१०अ त्याचप्रमाणे मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ४३ अन्वये त्याचप्रमाणे मुंबई कुळवहिवाट व शेंतजमिन नियम १९५६ चे नियम २५(अ) अन्वये बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करणेबाबत अनुज्ञा परवानगी देणेत येत आहे. त्याप्रमाणे गावचे अधिकार अभिलेखात कुळ कायदा कलम ४३ ची शर्त शिथील केलेली आहे.

११ अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमीनीचे बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यांस ज्या दिनांका पासून सुरुवात केली असेल किंवा ज्या दिनांकास त्यांने अशा जमीनीच्या वापरात बदल केला असेल तर तो दिनांक त्याने एक महिन्याच्या आंत तलाठया मार्फत वसई तहसिलदारांस कळविले पाहिजे. जर तो असे करण्यांस चुकेल तर महाराष्ट्र जमीन महसुल (जमीनीच्या वापरातील बदल व बिगरशेतकी आकारणी ) नियम १९६९ मधील नियम ६ अन्वये त्याच्यावर कार्यवाही करण्यांस असा अनुज्ञाग्राही पात्र ठरेल.

१२ अशा जमीनीचा त्या प्रयोजनार्थ वापर करण्यांस अनुज्ञाग्राहीस परवानगी देण्यांत आली असेल त्या प्रयोजनार्थ वापर करण्यांस प्रारंभ करण्याच्या दिनांका पासून सदर अनुज्ञाग्राहीने त्या जमीनीच्या संबंधात दर चौ. मी. मागे रुपये ०-१० या दराने बिगर शेतकी आकारणी दिली पाहिजे. किंवा परवानगीच्या तारखेच्या पूर्वलक्षी प्रभावाने अथवा त्यानंतर अंमलात येणारे बिनशेती आकार देणे बंधनकारक राहिल. अशा जमिनीच्या वापरात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यांत आला तर त्याप्रसंगी निराळया दराने बिगरशेतकी आकारणीच्या हमीची मुदत अजून समाप्त व्हावयाची आहे ही गोष्ट विचारात घेण्यांत येणार नाही.

१३ प्रस्तावित जमिनीची अतितातडीची मोजणी फी रक्कम रुपये १,९२,०००/-( अक्षरी रुपये एक लाख ब्याण्णव हजार मात्र ) चलन क्र. २०८/२००९ (भारतीय स्टेट बँक चलन क्र ०६९०) दिनांक ८/०९/२००९ अन्वये शासन जमा केली आहे.

१४ भूमापन विभागाकडून जमीनीची मोजणी करण्यांत आल्या नंतर अशा जमीनीचे जितके क्षेत्रफळ आढळून येईल तितक्या क्षेत्रफळानुसार या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेले क्षेत्र तसेच बिगरशेतकी आकारणी यांत बदल करण्यांत येईल.

१५ सदर जमीनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्रीने अशा जमीनीवर आवश्यक ती इमारत बांधली पाहिजे. अन्यथा सदरहू आदेश रदद समजण्यांत येईल. व अनुज्ञाग्राही यांना अकृषिक परवानगीसाठी नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

१६ पुर्वीच मंजूर केलेल्या नकाशाबरहुकुम अगोदरच बांधलेल्या इमारतीत अनुज्ञाग्राहीने कोणतीही भर घालता कामा नये किंवा ती मध्ये कोणताही फेरबदल करता कामा नये. मात्र अशी भर घालण्यासाठी किंवा फेरबदल करण्यासाठी जिल्हाधिका-यांची परवानगी घेतली असेल आणि अशा भरीचे किंवा फेरबदलाचे नकाशे मंजूर करुन घेतले असतील तर ती गोष्ट वेगळी.

१७ अनुज्ञाग्राही व्यक्तीने आजुबाजुच्या परिसरांत अस्वच्छता व घाण निर्माण होणार नाही अशा रीतीने आपल्या स्वत:च्या खर्चाने आपली पाणीपुरवठयाची व सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१८ जमीनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून एक महिन्याच्या कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने महाराष्ट्र जमीन महसुल ( जमीनीच्या वापरात बदल व बिगरशेतकी आकारणी ) नियम १९६९ यातील अनुसूची पाच मध्ये दिलेल्या नमुन्यात एक सनद करुन देऊन तीत या आदेशातील सर्व शर्ती समाविष्ट करणे त्यास बंधनकारक असेल

१८अ या आदेशात आणि सनदी मध्ये नमूद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे अनुज्ञाग्राही व्यक्तीने उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये असा अनुज्ञाग्राही ज्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल त्या शास्तीस बाधा न येऊ देता ठाण्याच्या जिल्हाधिका-यास तो निर्दिष्ट करेल असा दंड आणि आकारणी भरल्यानंतर उक्त जमीन किंवा भूखंड अर्जदाराच्या ताब्यात राहू देण्याचा अधिकार असेल.

१८ब वरील खंड अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही या परवानगीच्या तरतूदीविरुदध जाऊन कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभे करण्यांत आले असेल किंवा तरतूदी विरुदध या इमारतीच्या किंवा बांधकामाचा वापर करण्यांत आला असेल तर विनिर्दिष्ट मुदतीच्या आंत अशा रीतीने उभारलेली इमारत काढून टाकण्या विषयी किंवा तीत फेरबदल करण्याविषयी ठाण्याच्या जिल्हाधिका-याने निर्देश देणे विधी संमत असेल. तसेच ठाण्याच्या जिल्हाधिका-याला अशी इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याचे किंवा तीत फेरदल करण्याचे काम करवून घेण्याचा किंवा त्या प्रीत्यर्थ आलेला खर्च अनुज्ञाग्राही व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करुन घेण्याचा अधिकार असेल.

१९ दिलेली ही परवानगी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि नगरपालिका अधिनियम इ.सारख्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे कोणतेही उपबंध प्रकरणाच्या अन्य संबंधीत बाबींच्या बाबतीत लागू होतील. त्या उपबंधाच्या अधिन असेल.

२० जिल्हा परिषद ठाणे यांनी बसविलेला जिल्हा परिषद विशेष कर रक्कम रु. १,५०,६३०/- (अक्षरी रु. एक लाख पन्नास हजार सहाशे तीस मात्र) चलन क्र २६३/०९ (भारतीय स्टेट बँक शाखा ठाणे चलन क्र ०६९१) दिनांक ८/०९/२००९ रोजी भरणा केले आहेत.

२१ अनुज्ञाग्राही यांनी सिडको यांचे कडील मंजूर नकाशाबरहुकुमच बांधकाम केले पाहिजे. त्यात सिडको व महसुल खात्याचे पूर्व परवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

२२ अनुज्ञाग्राही यांनी सिडको कडील बांधकांम नकाशा व्यतिरिक्त जादा बांधकाम केल्यास अगर बांधकामा मध्ये बदल करुन जादा चटाईक्षेत्र निदेशांक वापरल्यास अनुज्ञाग्राही हे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ अन्वये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यांस पात्र रहातील व असे जादा बांधकाम दूर करण्यांस पात्र राहील.

२३ अनौपचारिक संदर्भाने तहसिलदार (रेतीगट) ठाणे यांचेकडील पत्र क्रमांक रेतीगट/ गौख/टे-५/कावि-/०९ दिनांक ८/०९/२००९ अन्वये जोता क्षेत्रावर होणारे गौण खनिज उत्खनन ९९८८ ब्रास वर होणारे स्वामीत्व धनाची रक्कम रु. ९,९८,८२५/- (अक्षरी रु. नऊ लाख अठ्याण्णव हजार आठशे पंचवीस मात्र ) चलन क्र. ४४/०९ (भारतीय स्टेट बँक शाखा ठाणे चलन क्र ०७००) दिनांक ८/०९/२००९ अन्वये भरणा केले आहेत.

२४. असो. प्लॅनर सिडको वसई यांचे दिनांक १९/०५/२००९ चे परवानगी मधील सर्व शर्ती अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहतील.

सही/-
(ए. एल जऱ्हाड)
जिल्हाधिकारी ठाणे.

प्रति,
मे. डी.डी.पी.एल ग्लोबल इंफ्रास्ट्रकचर प्रा.लि.चे संचालक श्री. हेमंत अनंत पाटील
व श्री. अमोल शंकरराव बोरकर, श्री. वत्सलाबाई बाबुराव भोईर व इतर,
श्री. ॲन्थोनी जॉण परेरा, श्रीम. नर्मदा चांगो कचरे व इतर,
श्री. भालचंद्र काळ्या भोईर, श्री. वासुदेव कृष्णा भोईर,
श्री. नारायण विठु शिंपी, श्रीम. कृष्णाबाई कृष्णा पाटील
व इतर ह्यांच्या तर्फे कुळमुखत्यारी स्वतः श्री. हेमंत अनंत पाटील,
रा. ए/४ सदिच्छा कॉ. सो. लि. रोकडीया लेन
एस.वी.पी रोड. बोरीवली (प) मुंबई

आदेश निर्गमित केले

जिल्हाधिकारी ठाणे करिता 8/9/09

परिशिष्ट - अ

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं | हि.नं. | क्षेत्र चौ.मी | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | टिवरी | ४७ | ८ | ६६०.०० | श्री. अमोल शंकरराव बोरकर |
| २. | | ३६ | २ | ६१०.०० | |
| ३. | | १६ | १ | १६२०.०० | |
| ४ | | १३ | ५ | २१५०.०० | |
| ५. | | ३३ | ८ | २३००.०० | |
| ६. | | ३३ | ९ | १६२०.०० | |
| ७. | | ७ | ११ | ६००.०० | |
| ८. | | ५ | ६/३ | ४३०.०० | |
| ९. | | ५ | ६/७ | ७३०.०० | |
| १०. | | ६ | २/२ | ६६०.०० | |
| ११. | | ६ | ३ | ८०.०० | |
| १२. | | ६ | ४ | १००.०० | |
| १३. | | ६ | ५/६ | १८७०.०० | |
| १४. | | ७ | २/१ | ५३०.०० | |
| १५. | | ७ | ५/१ | १२४०.०० | |
| १६. | | ७ | ६/२ | १३०.०० | |
| १७. | | ७ | ९/१ | ६८०.०० | |
| १८. | | ३० | ३ | ४८१०.०० | |
| १९. | | ३२ | २/२ | ४९८०.०० | |
| २०. | | ३२ | २/१ | ५०१०.०० | |
| २१. | | ३२ | २/३ | ४९८०.०० | |
| २२. | | २४ | १ | ८०९०.०० | |
| २३. | | २५ | -- | ४००.०० | |
| २४. | | २६ | १/१ | २१८०.०० | |
| २५. | | २६ | १/२ | २१७०.०० | |
| २६. | | २६ | १/३ | २१८०.०० | |
| २७. | | १२ | १ | ६१०.०० | |
| २८. | | २८ | २ | ५७७०.०० | श्रीम. वत्सलाबाई बाबुराव भोईर श्री. चंद्रकांत बाबुराव भोईर, श्रीम. हेमलता अनंत वाजेकर, श्रीम. दमयंती जयवंत भोईर, श्री. गणपत कान्हा भोईर, श्रीम. यमुना कृष्णा भोईर, श्री. सुभाष कृष्णा भोईर, श्री. देवानंद कृष्णा भोईर, श्रीम. पुष्पा राजन म्हात्रे, श्रीम. शांती सुरेश किणी, श्रीम. प्रेमा तुळशीडास गावड, श्रीम. ललिता सितराम राऊत, श्रीम. रेखा अनिल भोईर, श्रीम. लक्ष्मी जयवंत पाटील |
| २९. | | १० | २ | ३१९०.०० | |
| ३०. | | ५ | ६/२ | ४००.०० | |
| ३१. | | ६ | २/३ | १०६०.०० | |
| ३२. | | ६ | ५/१ | ७१०.०० | |
| ३३. | | ७ | १ | ४८०.०० | |
| ३४. | | ७ | ३ | ३००.०० | |
| ३५. | | ७ | ४/१ | ११४०.०० | |
| ३६. | | ७ | ४/५ | ५१०.०० | |
| ३७. | | ७ | ५/४ | ८०.०० | |
| ३८. | | ७ | ६/१ | १३०.०० | |
| ३९. | | ७ | ७ | १००.०० | |
| ४०. | | ८ | १ | ६००.०० | |
| ४१. | | ७ | ५/६ | ६८०.०० | |
| ४२. | | १० | १ | १११०.०० | श्री. जयवंत मोरेश्वर भोईर, प्रभाकर मोरेश्वर भोईर १/३, श्रीम. मालती लक्ष्मण किणी, |
| ४३. | | ५ | ६/४ | ४८०.०० | |
| ४४. | | ५ | ६/८ | ९१०.०० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४५. | | ६ | १/३ | ५०.०० | श्रीम. वत्सला आत्माराम पाटील १/३, श्रीम. मंजुळा रमेश भोईर, श्रीम. भारती अशोक पाटील |
| ४६. | | ६ | २/१ | २२२०.०० | |
| ४७. | | ६ | ५/२ | ११९०.०० | |
| ४८. | | ६ | ५/५ | १११०.०० | |
| ४९. | | ७ | ५/३ | २००.०० | |
| ५०. | | ७ | ५/५ | ८८०.०० | |
| ५१. | | ७ | ९/४ | ४००.०० | |
| ५२. | | ७ | ४/३ | १००.०० | |
| ५३ | | ४६ | ६ | २३८०.०० | श्री. हेमंत अनंत पाटील |
| ५४. | | ४४ | ८ अ | ९१०.०० | |
| ५५. | | ४४ | १० | १०१०.०० | |
| ५६. | | ४४ | १२ | ३०४०.०० | |
| ५७. | | ४४ | १४ | १५०.०० | |
| ५८. | | ४४ | १५ | १३०.०० | |
| ५९. | | ५० | ५ | ४४५०.०० | श्री. अंथोनी जॉन परेरा |
| ६०. | | ११७ | २ | ५०.०० | श्री. हेमंत अनंत पाटील |
| ६१. | | ६ | ६ | ६१०.०० | श्री. अंथोनी जॉन परेरा |
| ६२. | | ३६ | ६ | १८००.०० | |
| ६३. | | ३६ | ५ | १०१०.०० | |
| ६४. | | ४२ | ७ अ | ३१०.०० | |
| ६५. | | ३६ | ३ अ | १०८१०.०० | |

**एकूण क्षेत्र** **१,०१,७७०-०० चौ.मी.**

जिल्हाधिकारी ठाणे करिता

**परिशिष्ट ब**

**कुळ कायदा कलम ४३ ला पात्र**

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं | हि.नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | टिवरी | ३२ | १ | २८३०.०० | २-०० | श्रीम. नर्मदा चांगो कचरे, |
| २. | | २६ | २ ब | ६३१०.०० | ७-३४ | श्रीम. कुसुम केदारनाथ भोईर, |
| ३. | | १२ | १० | २१६०.०० | १-५० | श्रीम. ताराबाई परशुराम किणी, |
| ४. | | १२ | ५ | ५८०.०० | ०-३० | श्री. जयप्रकाश परशुराम किणी, |
| ५. | | १२ | ३ | १३१०.०० | ०-८६ | श्रीमती चंद्रभागा संदीप पाटील, |
| ६. | | १० | ४ | २३०.०० | ०-३१ | श्री. हरेश्वर परशुराम किणी, |
| ७. | | ५ | ४ | ५६०.०० | ०-४५ | श्री. जयवंत धर्मण भोईर |
| ८. | | ५ | ८ | ५०.०० | ०-०२ | |
| ९. | | २३ | -- | ९५३०.०० | ८-५० | श्री. भालचंद्र काळ्या भोईर |
| १०. | | १६ | ४ | ३५५०.०० | २-५७ | श्री. वासुदेव कृष्णा म्हात्रे |
| ११. | | २६ | २ अ | ३५३०.०० | २-१५ | |
| १२. | | २ | ३ | २५४०.०० | ४-९४ | श्री. हरिश्चंद्र कृष्णा भोईर |
| १३. | | ४५ | ४ | ५४६०.०० | ४-३४ | श्रीम. द्वारकाबाई हुलाजी पाटील, |
| १४. | | ५६ | २ | १२६०.०० | १-०० | श्रीम. माळती केशव पाटील, |
| १५. | | ६६ | ६ | ४५०.०० | ०-३१ | श्रीमती मोहना लक्ष्मण राऊत, |
| १६. | | ३३ | २ | ९४०.०० | ०-५५ | श्री. प्रकाश लक्ष्मण राऊत |
| १७. | | ३३ | ४ | ९१०.०० | ०-७५ | |
| १८. | | ३३ | ७ | २६०.०० | ०-२२ | |
| १९. | | ५४ | ६ | १२४०.०० | १-०० | |
| | | | एकूण | ४३७००-०० चौ.मी. | १७-८३ | |

जिल्हाधिकारी ठाणे करिता

## *परिशिष्ट क*

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं | हि.नं. | क्षेत्र चौ.मी | आकार | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | टिवरी | ५१ | ९ | ८१०.०० | ०.६२ | श्री. रमेश नारायण शिंपी व इतर |
| २. | | ५१ | ११ | ५८०.०० | ०.४८ | कुळ श्री. नरोत्तम कृष्णा पटील, श्रीम. अनुसया रमाकाम्त पाटील, श्रीम. चंपुबाई रतन मनेरा, श्रीम. चंद्राबाई मुकुम्द घरत, श्रीम. वनिता कृष्णा पाटील |
| ३. | | ४६ | ४ | १४४०-०० | १.१९ | कमळाकर शामराव वगळ व इतर कुळ कृष्णाबाई कृष्णा पाटील, नरोत्तम कृष्णा पाटील, अनुसया रमाकांत पाटील चंपूबाई रतन मनेरा श्रीम. चंद्राबाई मुकुम्द घरत, श्रीम. वनिता कृष्णा पाटील |
| ४. | | ४६ | ७ | २३३०-०० | १.६४ | कमळाकर शामराव वगळ व इतर कुळ कृष्णा हिरा पाटील नरोत्तम कृष्णा पाटील, अनुसया रमाकांत पाटील चंपूबाई रतन मनेरा श्रीम. चंद्राबाई मुकुन्द घरत, श्रीम. वनिता कृष्णा पाटील |
| | | | एकूण | ५१६०-०० चौ.मी. | ३-९३ | |

| | क्षेत्र चौ.मी. | आकार |
|---|---|---|
| परिशिष्ठ अ | १,०१,७७०-०० | |
| परिशिष्ठ ब | ४३७००-०० | १७-८३ |
| परिशिष्ठ क | ५१६०-०० | ३-९३ |
| एकूण क्षेत्र | १,५०,६३०-०० | २१-७६ |

जिल्हाधिकारी ठाणे करिता